Seat No. | | | | | | | |
बैठक क्र.

| 2024 | III | 22 | 1100 |
|---|---|---|---|
| २०२४ | ०३ | २२ | ११०० |

# N 662

(M)
(म)

SOCIAL SCIENCES (73) HISTORY AND POLITICAL SCIENCE PAPER-I

सामाजिक शास्त्रे ( ७३ ) इतिहास व राज्यशास्त्र पेपर - १

(REVISED COURSE)

Time : 2 Hours (Pages – 8) Max. Marks : 40

वेळ - २ तास ( पृष्ठे - ८ ) एकूण गुण - ४०

Allyas.com

**सूचना :**

(1) *सर्व प्रश्न/कृती सोडविणे आवश्यक आहेत.*

(2) *उजवीकडील अंक प्रश्नांचे / कृतींचे पूर्ण गुण दर्शवितात.*

(3) *प्रश्न क्रमांक 1 ते 5 प्रश्न/कृती इतिहास व प्रश्न क्रमांक 6 ते 9 प्रश्न/कृती राज्यशास्त्र या विषयांवरील आहे.*

(4) *प्रश्न क्रमांक 2(अ) आणि 8 (ब) मधील संकल्पनाचित्रे / कृती त्याच नमुना आराखड्यात पेनाने / पेन्सिलीने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.*

(5) *प्रश्न 1 ला (अ), (ब) व प्रश्न 6 वा या प्रश्नांची उत्तरे उत्तरपत्रिकेत एकापेक्षा जास्त वेळा लिहिलेले असेल तर प्रथम लिहिलेले उत्तर हे गुणांसाठी गृहीत धरले जाईल.*

1. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा : 3

(1) मथुरा शिल्पशैली ..................... काळात उदयाला आली.

(अ) कुशाण

(ब) गुप्त

(क) राष्ट्रकूट

(ड) मौर्य

(2) महाबळेश्वर जवळील भिलार हे ............ गाव म्हणून प्रसिद्ध आहे.

(अ) पुस्तकांचे

(ब) वनस्पतींचे

(क) आंब्याचे

(ड) किल्ल्यांचे

(3) "मानवी इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास असतो." असे मत .............. या तत्त्वज्ञाने मांडले आहे.

(अ) व्हॉल्टेअर

(ब) जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल

(क) लिओपॉल्ड व्हॉन रांके

(ड) कार्ल मार्क्स

(ब) पुढीलपैकी प्रत्येक संचातील चुकीची जोडी ओळखून पुन्हा लिहा : 3

| | गट 'अ' | | गट 'ब' |
|---|---|---|---|
| (1) (*i*) | कुटियट्टम | — | केरळमधील संस्कृत नाट्यपरंपरा |
| (*ii*) | रम्मन | — | पश्चिम बंगालमधील नृत्य |
| (*iii*) | रामलीला | — | उत्तर भारतातील रामायणाचे परंपरागत सादरीकरण |
| (*iv*) | कालबेलिया | — | राजस्थानचे लोकसंगीत आणि लोकनृत्य |

(2)

| | | | |
|---|---|---|---|
| (*i*) | दशावतार | — | त्यागराज |
| (*ii*) | खंजिरी भजन | — | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज |
| (*iii*) | कीर्तन | — | संत नामदेव |
| (*iv*) | भारूड | — | संत एकनाथ |


(3)

| | | | |
|---|---|---|---|
| (*i*) | जेम्स मिल | — | स्त्रीवादी इतिहासकार |
| (*ii*) | फ्रेडरिक मॅक्सम्युलर | — | प्राच्यवादी इतिहासकार |
| (*iii*) | न्या. महादेव गोविंद रानडे | — | राष्ट्रवादी इतिहासकार |
| (*iv*) | दामोदर कोसंबी | — | मार्क्सवादी इतिहासकार |

Allpyqs.com


2. (अ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा ( कोणतेही दोन ) : 4

(1) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :



**(2) पुढील कालरेषा पूर्ण करा :**

भारतातील नैसर्गिक जागतिक वारसास्थळे




(3) पुढील तक्ता पूर्ण करा :

| | ललित | भारूड |
|---|---|---|
| गुणवैशिष्ट्ये | | |
| उदाहरणे | | |

**( ब ) थोडक्यात टिपा लिहा ( कोणत्याही दोन ) :** **4**

(1) स्थळ कोश

(2) प्राच्यवादी इतिहासलेखन

(3) वर्तमानपत्रांचे भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील कार्य

**3. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा ( कोणतेही दोन ):** **4**

(1) फुको त्यांच्या लेखनपद्धतीला 'ज्ञानाचे पुरातत्त्व' असे म्हणत असत.

(2) चित्रकथीसारख्या नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या परंपरेचे पुनरुज्जीवन करणे गरजेचे आहे.

Allpyq.com

(3) खेळण्यांद्वारे इतिहासावर प्रकाश पडू शकतो.

(4) जागतिक वारस्याच्या पदास पात्र ठरणारी स्थळे, परंपरा यांची यादी युनेस्कोद्वारे जाहीर केली जाते.

4. **दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

मेजर ध्यानचंद हे हॉकीचे महान खेळाडू आणि भारतीय हॉकी संघाचे संघनायक होते. त्यांच्या नेतृत्वाखाली 1936 साली भारतीय हॉकी संघाने बर्लिन ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक जिंकले. त्यापूर्वी 1928 आणि 1932 मध्येही भारतीय हॉकी संघाने सुवर्णपदके जिंकली होती. तेव्हा ध्यानचंद हे भारतीय संघाकडून खेळले होते. 29 ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिवस 'राष्ट्रीय क्रीडा दिवस' म्हणून साजरा केला जातो. त्यांना 'हॉकीचे जादूगार' असे म्हणतात. 1956 मध्ये त्यांच्या हॉकीतील कामगिरीबद्दल त्यांना 'पद्मभूषण' या सन्मानाने विभूषित करण्यात आले. https://www.maharashtrastudy.com

**प्रश्न :**

(1) 'हॉकीचे जादूगार' कोणाला म्हणतात? 1

(2) भारतात मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस काय म्हणून साजरा केला जातो? 1

(3) मेजर ध्यानचंद यांची ऑलिंपिक स्पर्धेमधील कामगिरी थोडक्यात लिहा. 2

5. **पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा ( कोणतेही दोन ) :** 6

(1) स्त्रीवादी इतिहासलेखन म्हणजे काय?

(2) ग्रंथालय व्यवस्थापन का महत्त्वाचे आहे?

(3) कला क्षेत्रात व्यवसायाच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत हे स्पष्ट करा.

(4) दशावतारी नाटकांविषयी माहिती लिहा.

6. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा : 2

(1) 73 व्या व 74 व्या संविधान दुरुस्तीने ........................ च्या अधिकारात खूप मोठी वाढ झाली.

(अ) विधानसभा

(ब) स्थानिक शासनसंस्था

(क) लोकसभा

(ड) राज्यसभा

(2) जगातील सर्वच लोकशाही राष्ट्रांपुढील मोठे आव्हान म्हणजे .......... .

(अ) धार्मिक संघर्ष

(ब) नक्षलवादी कारवाया

(क) लोकशाहीची पाळेमुळे आणखी खोलवर नेणे

(ड) गुंडगिरीला महत्त्व

7. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा ( कोणतेही दोन ): 4

(1) विशिष्ट प्रसंगी निवडणूक आयोग एखादया मतदारसंघात पुन्हा निवडणुका घेतात.

(2) आघाडी शासनातून अस्थिरता निर्माण होते.

(3) ग्राहक चळवळ अस्तित्वात आली.

8. (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा ( कोणतेही एक ): 2

(1) राजकारणाचे गुन्हेगारीकरण

(2) हक्काधारित दृष्टिकोन


(ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (कोणतीही एक): 2

(1) पुढील ओघतक्ता पूर्ण करा:

निवडणूक प्रक्रिया

| |
|---|
| मतदारसंघांची निर्मिती |
| ↓ |
| |
| ↓ |
| उमेदवारांकडून नामांकन पत्र व अनामत रक्कम जमा करणे |
| ↓ |
| |
| ↓ |
| प्रत्यक्ष मतदान |
| ↓ |
| |
| ↓ |
| निवडणुकीचे निकाल |
| ↓ |
| |

(2) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :




**9.** **पुढील प्रश्नांचे थोडक्यात उत्तर लिहा ( कोणतेही एक ):** 2

(1) सामाजिक न्याय प्रस्थापित करणे म्हणजे काय?

(2) मध्यावधी निवडणुका म्हणजे काय?

◆◆◆

Allpyqs.com